# डॉ. खत्री महाविद्यालय तुकुम चंद्रपुर
# विद्यापीठ स्तरीय आंतरमहाविद्यालयीन कुस्ती स्पर्धा
# अहवाल २०२३-२४

स्थनिक डॉ. खत्री महाविद्यालय, तुकूम, चंद्रपूर येथे गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली द्वारा आयोजित विद्यापीठ स्तरीय आंतर महाविद्यालयीन कुस्ती (पुरुष व महिला) स्पर्धा दि. १९ व २० ऑक्टोबर २०२३ रोजी संपन्न झाली. या स्पर्धेचे उदघाटन कार्यक्रमाचे अध्यक्ष तसेच संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. एन. एच. खत्री सर यांचे शुभ हस्ते झाले. याप्रसंगी संस्थेचे सचिव डॉ. एस. बी. कपूर, संस्थेच्या कोषाध्यक्षा प्रा. अनुश्री पाराशर, सोबतच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे.एम. काकडे सर, यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

तत्पूर्वी नियोजित रुपरेषेनुसार सकाळी ८.०० ते १०.३० वाजेपर्यंत विविध महाविद्यालयातील कुस्ती स्पर्धकांची प्राथमिक नोंदणीमधे कागद पत्रांची तपासणी, वजन मोजने व इतर सर्व कार्य या अवधीत पूर्ण करण्यात आले. त्यानंतर उद्धाटन कार्यक्रम पार पडला. त्यानंतर लगेच कुश्ती स्पर्धेला सुरवात करण्यात आली. त्यात फ्री स्टाइल (पुरुष व महिला) व ग्रीकोरोमन प्रकारात मुले अश्या एकुण तीस प्रकारच्या वजन गटात अत्यंत चुरशिचे सामने मैदानात रंगले होते. विद्यापीठातील विविध महाविद्यालयातील जवळपास ५० ते ५५ पुरुष व महिला स्पर्धकानी या कुश्ती स्पर्धेत सहभाग नोंदविला होता. सर्व कुश्ती स्पर्धकाकारिता सकाळी चहा, बिस्किट, फळ व नाश्ता व दुपारी भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती. तसेच त्यांच्या निवासची व्यवस्था सुद्धा करण्यात आली होती.

या स्पर्धेच्या परीक्षणाकरिता प्रमुख मार्गदर्शक म्हणून श्री. बाळूभाऊ उर्फ धर्मशील काटकर तसेच श्री. सुहास बनकर सोबतच श्री. बडकेलवार, श्री. प्रफुल चौधरी, प्रा. विकी पेटकर, अनेक बऱ्याच मान्यवरांचे सहकार्य लाभले. दुपारी ४.०० वाजता कुश्ती स्पर्धा संपन्न झाल्यानंतर बक्षिस वितरण समरोपीय कार्यक्रम पार पडला. यात प्रामुख्याने संस्थेच्या कोषाध्यक्षा प्रा. अनुश्री पाराशर, सोबतच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे.एम. काकडे सर, रसायनशास्त्र विभागप्रमुख डॉ. शरयु कटकमवार, गणित विभागप्रमुख डॉ. डी. एन. वराड़े, क्रिडा व शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख श्री. आशिष चहारे या सर्व मान्यवरांच्या हस्ते विजेत्या स्पर्धक विद्यार्थ्यांना सुवर्ण पदक व पारितोषिके देऊन सन्मानित करण्यात आले.

ही स्पर्धा महाविद्यालयातील क्रिडा व शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख श्री. आशिष चहारे यांनी नियोजन पूर्वक आयोजित केली. ही स्पर्धा संस्थेचे सर्व पदाधिकारी आणि महाविद्यालयाचे प्राचार्य यांच्या मार्गदर्शनातून आयोजित करण्यात आली.

या स्पर्धेकरिता महाविद्यालयातील प्राध्यापकांचे व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले. उदघाटन सोहळयाचे संचालन डॉ. आर. यु. मुरमाडे यांनी केले. समारोपीय सोहळ्याचे संचालन डॉ. रवी वाळके यांनी केले. तर मान्यवरांचे आभार प्रा. आशिष चहारे यांनी मानले. याप्रसंगी महाविद्यालयातील बरेचसे विद्यार्थी उपस्थित होते.

सदर विद्यापीठ स्तरीय आंतर महाविद्यालयीन कुस्ती (पुरुष व महिला) स्पर्धेचा अहवाल व त्याची छायाचित्रने आपल्या महितिस्तव सविनय सादर.




**कुशती स्पर्धे दरम्यान घेतलेली छायाचित्रने**


गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली संलग्नीत
ज्ञानदीप शिक्षण प्रसारक मंडळ, चंद्रपूर व्दारा संचालित
डॉ.खत्री महाविद्यालय, तुकूम, चंद्रपूर
व्दारा आयोजित
आंतर महाविद्यालयीन कुस्ती स्पर्धा
सत्र २०२३-२०२४


गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली संलग्नीत
डॉ.खत्री महाविद्यालय, तुकूम, चंद्रपूर
आंतर महाविद्यालयीन कुस्ती स्पर्धा
सत्र २०२३-२०२४


गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली संलग्नीत
डॉ.खत्री महाविद्यालय, तुकूम, चंद्रपूर
आंतर महाविद्यालयीन कुस्ती स्पर्धा


गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली संलग्नीत
ज्ञानदीप शिक्षण प्रसारक मंडळ, चंद्रपूर व्दारा संचालित
डॉ.खत्री महाविद्यालय, तुकूम, चंद्रपूर
व्दारा आयोजित
आंतर महाविद्यालयीन कुस्ती स्पर्धा
सत्र २०२३-२०२४
स्थळ: डॉ.खत्री महाविद्यालय,तुकूम, चंद्रपूर


डॉ.खत्री महाविद्यालय, तुकूम, चंद्रपूर
आंतर महाविद्यालयीन कुस्ती स्पर्धा
सत्र २०२३-२०२४


गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली संलग्नीत
डॉ.खत्री महाविद्यालय, तुकूम, चंद्रपूर
आंतर महाविद्यालयीन कुस्ती स्पर्धा
सत्र २०२३-२०२४


गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली संलग्नीत
डॉ.खत्री महाविद्यालय, तुकूम, चंद्रपूर
आंतर महाविद्यालयीन कुस्ती स्पर्धा
सत्र २०२३-२०२४

